
www.surajyadigital.com
अस्सल सोलापुरी
# सुराज्य
सोलापूर
सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

। शुक्रवार, दि. १७ ऑक्टोबर २०२५ । ▸ वर्ष : २४ वे ▸ अंक : २० वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

# पद्माकर काळे, कोल्हेंसह अनेकजण भाजपमध्ये दाखल

## मुंबईमध्ये मोठी राजकीय घडमोड; पाटील, प्रधानेंची घरवापसी

✔ सोलापूर/प्रतिनिधी



मुंबईत प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, पालकमंत्री जयकुमार गोरे, आ.कल्याणशेट्टी, आ.कोठे, रोहिणी तडवळकर यांच्या उपस्थितीत दिलीप कोल्हे, नाना काळे, बिज्जू प्रधाने, सुरेश पाटील यांचा भाजप प्रवेश झाला.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सोलापूर शहरातील राजकारणातील मोठी राजकीय खळबळ उडाली आहे. गुरुवारी रात्री मुंबईत झालेल्या महत्त्वाच्या बैठकीत शहरातील अनेक माजी नगरसेवकांनी भारतीय जनता पक्षात प्रवेश केला. तर अनेकांची घरवापसी झाली आहे. यामध्ये दिलीप कोल्हे, पद्माकरनाना काळे, मंदाकिनी तोडकरी, सुभाष डांगे, बिज्जू प्रधाने यांच्यासह अनेकांचा समावेश आहे. या सर्वांनी आ. देवेंद्र कोठे यांच्या नेतृत्वाखाली भाजपमध्ये प्रवेश केला आहे.


आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपमध्ये अनेकजण प्रवेश करणार अशी चर्चा सुरू होती. मात्र त्याचा मुहूर्त कधी लागणार याची उत्सुकता होती.

अखेर गुरूवारी त्याला मुहूर्त लागला. प्रवेशापूर्वी झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे, आमदार सचिनकल्याण शेट्टी, आ. देवेंद्र कोठे उपस्थित होते. बैठकीनंतर प्रवेश सोहळयास रात्री उशिरा सुरवात झाली. प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत माजी उपमहापौर दिलीप कोल्हे, पद्माकर काळे, मंदाकिनी तोडकरी, बिज्जू प्रधाने, सुभाष डांगे, मारूती तोडकरी, कल्पना क्षीरसागर, रवि काळे, आदींसह प्रवेश रात्री उशिरा पार पडला. दुसरीकडे सुरेश पाटील, बिपीन पाटील यांनीही घरवापासी केली आहे.

यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आ.सचिन कल्याणशेट्टी, आ.देवेंद्र कोठे, शहराध्यक्षा रोहिणी तडवळकर आदी प्रमुख उपस्थित होते.

## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



बोट ठेवायला जागा नको!

| | |
|---|---|
| संगम श्री डे | 240-64-699 |
| संगम श्री नाईट | 478-97-250 |
| कल्याण | 139-31-128 |
| मुंबई | 279-88-279 |

### माने, राजन पाटील, शिंदेंबाबातही चर्चा; लवकरच प्रवेश

मुख्यमंत्र्यांसोबत झालेल्या बैठकीत माजी आमदार दिलीप माने, राजन पाटील, यशवंत माने, रणजितसिंह शिंदे यांच्याही भाजप प्रवेशबाबात चर्चा झाल्याची माहिती आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांनीही त्यांना ग्रीन सिग्नल दिल्याची माहिती सूत्रांनी दिली. लवकरच मोठ्या सोहळ्यात त्यांचा प्रवेश होईल, असे समजते. या बैठकीला माजी आमदार दिलीप माने उपस्थित होते.

### आ. देवेंद्र कोठेंच्या माध्यमातून प्रवेश

गुरूवारी शहरातील झालेले सर्व प्रवेश आमदार देवेंद्र कोठे यांच्या माध्यमातून झाले आहेत. प्रवेश करणारे सर्व नेते हे शहर उत्तरमधील आहेत. त्यामुळे याचे परिणाम आगामी काळात शहर भाजपच्या राजकारणावर होणार आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून हे नेते भाजपमध्ये जाणार अशी चर्चा सुरूच होती. मात्र प्रवेशाला या ना त्या कारणाने विलंब होत होता. अखेर आ. कोठेंच्या मध्यस्थीने हे प्रवेश गुरूवारी रात्री पार पडले.

